RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—क

वर्ष ४, अंक २३] सोमवार, मे २८, २०१८/ज्येष्ठ ७, शके १९४० [पृष्ठे १२०६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिका-यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**तर्फे निवडणूक निर्णय अधिकारी, भारतीय दंत परिषदेवर महाराष्ट्र राज्यातून नोंदणीकृत दंतवैद्यांपैकी एक सभासद निवडून देण्याबाबत**

क्रमांक ३डीसीआय/३.—भारतीय दंतपरिषदेच्या कायद्यातील (निवडणूक) विनियम, १९५२ (सुधारित २८ ऑक्टोबर १९८३ पर्यंत) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यातून नोंदणीकृत दंतवैद्यापैकी एक सभासद भारतीय दंत परिषदेवर निवडून देण्याकरिता वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांचे शासन पत्र क्र. भादंप ०४१८/प्र.क्र. १२०/अधिनियम, दिनांक ८ मे २०१८ अन्वये निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दंतवैद्य अधिनियम, १९४८ च्या कलम ३ उप-कलम (क) मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत व पुनर्नोंदणी झालेले दंतवैद्य निवडणुकीसाठी मतदान करण्यास पात्र असून त्यांची मतदार यादी तयार केली आहे.

भारतीय दंत परिषद (निवडणूक) विनियम, १९५२ च्या विनियम ३ उप विनियम २ अन्वये प्राथमिक मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी.डी.एस. अर्हताधारक तसेच आवश्यकतेनुसार ज्यांनी आंतरवासिता कालावधी पूर्ण केला असून त्यांनी ३१ मार्च २०१८ पर्यंत किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेच्या कार्यालयात सर्व प्रशासकीय बाबीची पूर्तता करून नोंदणी केलेली आहे अथवा नोंदणीचे नूतनीकरण केले आहे. त्यांची नावे प्राथमिक मतदार यादीत वर्णाक्रमानुसार समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

अधिकृत मतदारांचा महाराष्ट्र राज्य दंत परिषदेच्या कार्यालयात दिनांक ३१ मार्च २०१८ वा त्यापूर्वी नोंदविलेला संपर्कासाठी पत्ता प्राथमिक मतदार यादीत प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम.डी.एस. अर्हताधारकांनी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेतील तरतुदीनुसार पदव्युत्तर शिक्षणाची नोंद त्यांच्या अधिकृत नोंदणी प्रमाणपत्रावर करून घेतली असली तरी एम.डी.एस. अर्हता प्राप्त केल्यानंतर दुसरा नोंदणी क्रमांक देण्याची तरतूद नसल्याने त्यांच्या नावासमोर बी.डी.एस. अर्हता प्राथमिक मतदार यादीत नोंदण्यात आलेली आहे.

प्राथमिक मतदार यादीतील सर्व मतदारांना कळविण्यात येते की, यादी संबंधित कोणतेही आक्षेप किंवा हरकती असल्यास पुराव्यासहित निवडणूक निर्णय अधिकारी, तिसरा मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई ४०० ००१ येथे लेखी स्वरूपात अथवा ro3adci@gmail.com या ई-मेलवर दिनांक १५ जून २०१८ रोजी दुपारी ३-०० वाजेपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. यानंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## BY THE RETURNING OFFICER FOR THE ELECTION OF A MEMBER TO THE DENTAL COUNCIL OF INDIA

No. 3aDCIE/3.—In accordance with sub-rule (2) of rule 3 of the Dental Council (Election) Regulation, 1952 (Modified upto 28th October 1983) made by the Dental Council of India with the approval of the Central Government under section 20 of the dentist Act, 1948. The Preliminary Electoral Roll of persons who are qualified to vote in the election under clause (a) of section 3 of the Dentist Act, 1948, prepared by the Returning Officer appointed by the Government of Maharashtra by their Notification Medical Education and Drugs Department No. IDC. 0418/C.R. 120/ACT, Dt. 08th May 2018 is published for information to fill up the vacancy caused by the expiry of the term of office of the setting of one member. The electors are advised to note that the roll is prepared in accordance with Rule 3 of the Election Regulation to include names born on Part A of the State dentist register on 31st March 2018, and is arranged alphabetically.

The Preliminary Electoral Roll is published as per the Provision in sub-rule (2) of rule 3 of the Dental Council (Election) Regulations, 1952.

Those who have completed their B.D.S. and internship as, or if applicable, and registered and renewed their registration online or in person, on or before 31st March 2018 are included in the Preliminary Electoral Roll.

Addresses as per record of the Maharashtra State Dental Council office on 31st March 2018 are considered as valid and are included in the Preliminary Electoral Roll.

All those who have registered on and before 31st March 2018 and also have completed their M.D.S. degree and registered for their higher qualifications, are part of the Preliminary Electoral Roll. However, their B.D.S. qualification is only displayed as there is no provision for giving separate registration number for M.D.S.

Notice is also hereby given in accordance with sub-rule (3) of rule 3 of the said regulation that any objections to the entries or omissions in the Electoral Roll can be submitted in writing with proof at the office of the Returning Officer, 3rd Floor, Govt. Dental College and Hospital, Mumbai 400 001 or on Email id- ro3adci@gmail.com so has to reach on or before 15th June 2018 at 3-00 p.m. Kindly note that any objections if received after due date/stipulated will not be considered.